# प्रसिध्दी पत्रक

**श्री. नारायण केशव भराटे, वय ५५ वर्षे, नौकरी सहायक फौजदार, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर हे २०,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. नारायण केशव भराटे, वय ५५ वर्षे, नौकरी सहायक फौजदार, बक्कल नंबर ४११३, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर,<br>रा. बिल्डींग नंबर १२/७, पोलीस कॉलनी, एन-१०, टीव्ही सेंटर, हडको, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १२/११/२०१८ रोजी पोलीस ठाणे सातारा समोरील रॉयल चहाच्या टपरीजवळ |
| लाचेची रक्कम | :- | २०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या पत्नीने त्यांच्या विरुद्ध पोस्टे सातारा येथे दिलेल्या तक्रार अर्जात मा. समादेशक, राज्य राखीव बल गट क्र. १४, सातारा परिसर, औरंगाबाद यांना रिपोर्ट न करण्यासाठी |

यातील तक्रारदार हे राज्य राखीव बल गट क्र. १४, सातारा, औरंगाबाद येथे पोलीस कर्मचारी असून, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे त्यांच्या पत्नीने त्यांच्या विरुद्ध तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाच्या संदर्भाने पोलीस ठाणे सातारा येथे नेमणुकीस असलेले, सहायक फौजदार नारायण केशव भराटे यांनी तक्रारदार यांचे वरिष्ठ अधिकारी मा. समादेशक, राज्य राखीव बल गट क्र. १४, सातारा, औरंगाबाद यांना रिपोर्ट न करण्यासाठी ५०,०००/- रु लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली होती. परंतू तक्रारदार यांची आलोसे श्री. नारायण केशव भराटे, नौकरी सहायक फौजदार, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १२/११/२०१८ रोजी श्री. नारायण केशव भराटे, नौकरी सहायक फौजदार, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, श्री. नारायण भराटे यांनी तक्रारदार यांच्याविरुद्ध तक्रारदार यांच्या पत्नीने दिलेल्या तक्रार अर्जात मा. समादेशक, राज्य राखीव बल गट क्र. १४, सातारा परिसर, औरंगाबाद यांना रिपोर्ट न करण्यासाठी ५०,०००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडी अंती २०,०००/- रु स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१२/११/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, श्री. नारायण केशव भराटे यांनी पंच साक्षीदारा समक्ष २०,०००/- रुपये लाचेची रक्कम पोलीस ठाणे सातारा समोरील रॉयल चहाच्या टपरीजवळ तक्रारदाराकडून स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४

Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधिक्षक कार्यालय
अँटी करप्शन ब्युरो औरंगाबाद

**बाळा कुंभार**
**पोलीस उपअधिक्षक,**
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.